# मेट्रोचा प्रवास सुरक्षितही होणार

## आरे ते कुलाबा मार्गिकेवर अपघात टाळण्यासाठी काचेचे दरवाजे





**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ स्थानकात प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी असे फलाटापासून छतापर्यंतचे काचेचे दरवाजे उभे करण्यात आलेले आहेत.**

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** डिसेंबर २०२३मध्ये सुरू होण्यासाठी सज्ज होत असलेल्या मेट्रो-३ च्या (आरे ते कुलाबा) गाडीत चढण्यासाठी काचेचे दरवाजे पूर्णपणे सज्ज झाले आहेत. स्थानकांचा फलाट व रुळांमधील हे दरवाजे आहेत. अपघात टाळण्यासाठी असलेले हे दरवाजे या मार्गिकेवरील जवळपास पूर्णच स्थानकांत लावून पूर्ण झाले आहेत.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर ते दक्षिण जोडणारा मेट्रो-३ हा वाहतूककोंडीवर मात करण्यासाठीचा महत्त्वाचा मेट्रो प्रकल्प आहे. पूर्णपणे भुयारी असलेल्या मार्गिकेवर २६ स्थानके आहेत. सारिपूतनगर (आरे) ते बीकेसी (प्राप्तीकर कार्यालय), अशा दोन टप्प्यांत हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. या मार्गिकेवरील प्रत्येक स्थानकात मेट्रो रेल्वेत चढण्यासाठी फलाटाला पूर्ण फलाट झाकणारे काचेचे कवच असेल. त्याची उभारणी आता पूर्ण झाली आहे.

फलाटाला असलेल्या काचेचे कवचाला 'प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स' असे नाव आहे. यामध्ये फलाटावर गाडी नसेल त्यावेळी त्याला कवच लागलेले असेल. यामुळे रेल्वेमार्गावर पडून होणारे अपघात होत नाहीत. गाडी आल्यावर या फलाटाला असलेल्या कवचाचे दार फक्त गाडीच्या दरवाज्याजवळ उघडले जाऊल. त्यातून प्रवासी डब्यात प्रवेश करू शकतील. गाडी सुटताना आधी गाडीचे दरवाजे लागतील व नंतर फलाटाचे. मेट्रो-३ च्या पहिल्या टप्प्याची कामे झपाट्याने पूर्ण होताना प्रामुख्याने मरोळ नाका, सीप्झ, एमआयडीसी व छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ या स्थानकांच्या फलाटावरील हे कवच बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

### फलाटापासून छतापर्यंत

'प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स' बसविण्याचा पहिला प्रयोग लंडन मेट्रोमध्ये सर्वात आधी झाला. त्यानंतर आता जगभरातील ३८ देशांमधील मेट्रोमध्ये फलाटाला अशाप्रकारचे कवच आहे. त्यामध्ये भारतातील दिल्ली, कोलकाता, बेंगळुरू व चेन्नई येथील मेट्रोचा समावेश आहे. मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) अलिकडेच पूर्णरुपात सुरू केलेल्या मेट्रो २ अ व मेट्रो ७ ला मार्गिकांवर ही सुविधा उपलब्ध आहे. परंतु त्यातील हे कवच केवळ चार फुटांचे आहे. मेट्रो ३ ही मार्गिका भूमिगत असल्याने फलाट ते छत, असे पूर्णरूपात हे कवच बसविण्यात आले आहे.